# मुंबई विद्यापीठ

अत्यंत महत्वाचे / हस्ते बटवडा

क्र.वि.क./ १८ /२०१३

परिपत्रक :-

विषय :- भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाची नोंदणी करणे बाबत.

विद्यापीठातील विविध विभागांचे संचालक /विभाग प्रमुख तसेच प्राचार्य, सर्व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व एम.सी.ए महाविद्यालये तसेच, संचालक, व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था व तत्सम महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, भाग-१, चौथा मजला, आर.सी.मार्ग, चेंबूर (पु), मुंबई - ४०० ०७१ यांनी त्यांचे पत्र क्र.सआसक/मु.श/शिष्यवृत्ती/आधारकार्ड/२०१२-१३/१६५, दिनांक १९ जानेवारी, २०१३ नुसार भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, अपंग विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ राष्ट्रीयकृत बँकेमार्फतच देण्यात यावा अशा सूचना आहेत. ज्या विद्यार्थ्यांना आधार क्रमांक यापूर्वी मिळाला असेल किंवा अधार नोंदणी (EID) केलेली असेल त्यांनी आपला अधार क्रमांक (EID/UID) ई-स्कॉलरशिप अर्जामध्ये त्वरीत अचुक नोंद करणे व सदर क्रमांक संबंधित बँकेमध्ये जाऊन बँक खात्याशी संलग्न (लिंकअप) करण्यास बँकेस सांगावे अशा सूचना त्वरीत विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे असे त्यांनी उपरोक्त पत्रामध्ये कळविले आहे.

उक्त योजनेशी इत्यभूत माहिती सर्वसंबंधित विभागाचे संचालक / विभाग प्रमुख, अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना अवगत करण्यासाठी कुलसचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २ फेब्रुवारी, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता पदवीदान सभागृह, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे कार्यशाळा आयोजित केली असून वरील योजनेची माहिती सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर देणार आहेत. तरी सर्व विभागाचे संचालक / विभाग प्रमुख, प्राचार्य तसेच संबंधित काम पाहणारे शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी वरील कार्यशाळेसाठी उपस्थित रहावे.

दिनांक :- २२ जानेवारी, २०१३
स्थळ :- मुंबई - ४०००३२.

(कुमार खैरे)
कुलसचिव

---

प्रति,

संचालक, मान्यता प्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील सर्व संचालक / विभाग प्रमुख व सर्व प्राचार्य, संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, एम. सी. ए., व्यवस्थापन अभ्यासक्रम व तत्सम महाविद्यालये.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) समन्वयक यांना विनंती करण्यात येते की, मुंबई विद्यापीठ संगणक केंद्र यांनी सदर परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

प्रत माहितीसाठी :-

१) मा. विशेष जिल्हा समजा कल्याण अधिकारी, मुंबई शहर व उपनगरे,
२) मा. वित्त व लेखा अधिकारी, मुंबई
३) मा. कुलगुरुंचे कार्यकारी सचिव.
४) स्वीय सहायक, कुलसचिव